**प्रेसनोट** **दिनांक २२/०८/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी पोलीसांकडुन जेरबंद.

दिनांक-१९/०८/२०१९ रोजी १८.३० वाजताचे सुमारांस तक्रारदार महिला यांना यातील आरोपी विनायक बापु वाघ, वय २७ वर्ष, रा. ३८९ नारायण पेठ, पुणे, मुळगाव - मु.पो. शिराढोण, ता.तुळजापुर, जि. उम्मानाबाद हा वेळोवेळी फोन करीत असल्याने फिर्यादीने त्यास मला तु नेहमी फोन का करतो अशी विचारणा केली असता त्याने मी तुला फोन करणार, तुला काय करायचे ते कर, अशी धमकी देवून पाठलाग करुन दगड घेवून मारणेस धावून जावून गाडी अंगावर घालणेचा प्रयत्न करुन विनयभंग केलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-३०१/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३५४(अ)(१)(ड), ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता.

माननीय पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना व सदर गुन्हयातील वरनमुद आरोपी विनायक बापु वाघ हा आपले अस्तीत्व लपवून वावरत असतांना तो मोदी गणपती जवळ येणार असलेबाबत माहिती मिळाल्याने त्याआधारे विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री विजय जाधव, महिला पोलीस उप निरीक्षक गिता पाटील व स्टाफ यांनी वरनमुद गुन्हयांतील पाहीजे आरोपी विनायक बापु वाघ, वय २७ वर्ष, रा. ३८९ नारायण पेठ, पुणे, मुळगाव - मु.पो. शिराढोण, ता.तुळजापुर, जि. उम्मानाबाद यांस दिनांक-२१/०८/२०१९ रोजी २३.१५ वा. सापळा रचुन ताब्यांत घेवुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर